ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# दुरद्रष्टी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. लदाफ शफी खाजामैनोद्दीन
इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय, औसा ता. औसा जि. लातूर

## प्रास्तावीक :-



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणुन आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखतो त्यांनीह आपले संपूर्ण जिवन समाजबांधवाच्या उन्नतीसाठी वाहुन घेतले होते .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. आपल्याला जो त्रास झाला तो इतरांना होऊ नये त्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले डॉ. बांबेडकर दलित शोषित आणि अस्पृश्यतेमुळे अन्याय ग्रस्त झालेल्या जनतेसाठी संघर्ष करणारे एकमेव महापुरुष होते. त्यांची बरोबरी करणारा इतिहासात दुसरा कोणीही आढळुन येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दुरदर्शी नेते होते. दलित शोषीत आणि महिलांना न्याय मिळुन देण्यासाठी त्यांनी संसदेत 'हिंदू कोड बिल' मांडले भारतातील स्त्री मुक्ती अंदोलनाच्या दृष्टीने या बिलाचे विशेष महत्त्व आहे. त्याच बरोबर डॉ. बाबासाहेब आर्थिक विषयाचे गाढे अभ्यासक होते. शेअर्स सारख्या विषयाचा त्यांनी तेव्हा सखोल अभ्यास केला होता. 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' हा ग्रंथ त्यांनी लिहला होता.त्यावर त्यांना ब्रिटिश विद्यापीठांनी पी.एच.डी. प्रधान केली होती. या प्रबंधामध्ये त्यांनी भारतीय चलनावर मुलभूत चिंतन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक विचार सरणी, अंगीकारक असताना आपल्या हातीा घेतलेले कार्य पूर्ण करण्यासाठी ते सर्वाधिक परिश्रम घेत असत. कोणत्याही विषयाचा ते सखोल अभ्यास करित असे. ते बौध्द धर्माचा स्विकार करण्यापूर्वी त्यांनी बौध्द वाङःमयाचा सखोल अभ्यास केला व त्यावर आधारित बुध्द ॲन्ड हिज धम्म हा ग्रंथ लिहला. बौध्द धर्मियांसाठी हा सर्वाधिक महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. क्ष्यांनी आपल्या आनुयांना सदैव ज्ञान संपादन करत रहावे असा सल्ला दिला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौध्द धर्माची दिक्षा घेवुन लाखो वंचितांना आत्मविश्वास मिळवुन दिला.[1]

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दारकमिशनाला निवेदन :-

डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी कळविले होते. प्रांतांचा निर्णय घेण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपल्या अधिकारात दार कमिशन नेमले होते. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुळ हेतु काय होता हे लक्षात येते. 8 नोव्हेंबर 1948 रोजी दार कमिशन मुंबई येथे आले.त्यावेळी अनेक संस्था व व्यक्तींनी कमिशनला निवेदन दिले. त्याच प्रमाणे डॉ. आंबेडकरांनी ही दार कमिशनला निवेदन दिले. त्यामध्ये महत्त्वाची पाच कलमे होती. भाषावर प्रांतरचना लांबणीवर टाकता येणार नाही. भारताच्या पूर्व पंजाब प्रांताची घटना भाषावर प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार झालेली आहे.मुंबई मद्रास आणि मध्यप्रांत या प्रांताची पूर्ण घटना भाषावर प्रांत रचनेच्या तत्त्वावर करण्यात यावी अशी कळकळीची मांगणी केली आहे. असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले त्याच बरोबर डॉ. आंबेडकर हे भारताचे कायदे मंत्री होते. त्यांनी दार कमिशनला दिलेल्या निवेदनात भाषावर प्रांतरचनेच्या संबंधात एक वेगळा मुद्दा मांडला निवेदनात डॉ. आंबेडकर म्हणताले.," गुजरातच्या कांही भागात ब्राम्हणांचा प्रभाव आहे. तर कांही भागात पटेल यांचा प्रभाव आह. आणि हे दोन्ही जमाती एक होण्याची शक्यता आहे.असे झाल्यास इतर जमातीवर मात्र त्यांचे दडपण आल्याशिवाय राहणार नाही.[2]

**हिंदू कोडबिल :-**

स्त्रियांच्या बाबतीत वारसाहक्क व विवाह याबाबत अनेक अन्याय कारक कायदे होते त्यात योग्य सुधारणा झाली पाहिजे असे सुधारक व स्त्रियांच्या संस्था यांना वाटत होते. क्ष्याच प्रमाणे चळवळी करण्यात आल्या या कलमामध्ये दुरुस्ती सुचविणारी अनेक बिले कायदे मंडळात आणली गेली त्याचीच परिणीती म्हणुन इ.स. 1937 मध्ये हिंदु स्थियांच्या मालमत्ते संबंधीच्या हक्काचा कायदा करण्यात आला पण या सुधारणे मुळे फायदेपंडित समाजसुधारक आणि सुशिक्षित स्त्रीया यांचे समाधान झाले नाही. हिंदु फायद्यात सर्व प्रकारच्या चांगल्या सुधारणा झाल्या पाहिजेत अशी त्यानी चळवळ सुरु केली . या सर्व सुचनांचा विचार करुन सरकारने इ.स. 1941 साली 'हिंदू कोडबील' कमिटी नेमली सर्व हिंदू काड कायद्याचे संहितीकरण करुन सर्व हिंदू स्त्रीयांना समान हक्क देण्यात यावे हे या समितीचे प्रमुख काम होते[3]

भारतीय संविधानाचे काम पूर्ण होताच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलावर त्यांनी आपली सर्व शक्ती पणला लावी हिंदू कोड बी या बाबत जेव्हा वर्तमानपत्रातुन संदर्भ येत तेव्हा त्यास 'आंबेडकर स्मृती' असे संबोधतले जात असे. त्यावेळी आंबेडकर कायदेमंत्री होते. त्यामुळे कोडला कायदेशीर भाषेचा रुप देण्याचे प्रमुख कार्य त्यांच्याकडे होते. तरी ते आपल्या कार्य वृत्तीतुन हिंद कोडसाठी खुप मेहनत घेत होते. विरोधकांशी चर्चा करुन त्यांची बाजु कशी चुकीची आहे हे विधेयक समाजाला कसेहीत कारक हे मनापासुन पटवुन देत होते. राज्य घटना व हिंदु कायदा दोन महत्त्वाची देणगी आपण भारताला देत आहोत. या जाणवेतुन हे कार्य करीत होते. म्हणुन हिंदी कायदा चांगला व्हावा. म्हणुन प्रत्येक कलम काळजीपुर्वक तपासुन पुन्हा पुन्हा लिहत असत आणि शेवळी फार परिश्रम करुन त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले हिंदु कोड बिलाचा मसुदा तयार झाल्यावर त्याला लोक सभेत मांडण्याची संमती पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु व इतर नेत्यांना दिली परंतु प्रतिगामी लोकांनी त्याला प्रखर विरोध करण्यास सुरुवात केली परंतू 5 फेब्रुवारी 1951 रोजी डॉ. आंबेडकर हिंदू कोडबील लोकसभेत मांडले. 17 सप्टेंबर 1951 रोजी विधेयकावर लोकसभेत चर्चा झाली. शाम सुंदर मुखर्जी, सरदार पोल, सरदार भुपेंद्रसिंगजी यांनी विधेयकास विरोध केला. पंडित नेहरुनीं प्रारंभी विधेयकास पाठींबा दिला असला तरी ते या मताशी शेवटपर्यंत ठाम राहु शकले नाही. ? केवळ गाडगीळ यांनी शेवटपर्यंत विधेयकाचे समर्थन केले. मात्र डॉ. आंबेडकर यांना प्रतिगाम्यांचा व स्वकीयांचा या बिलाला कीतीही विरोध झाला तरी ज्या – ज्या स्वरुपात हे बिल तयार केले होते त्या स्वरुपात मंजूर झाले पाहिजे या भूमिकेला चिटकुन बसले होते. या कायद्यामुळे बहुजन समाजाचे जेवढे हीत होईल तेवढे हीत घटना करु शकत नाही असे त्यांचे ठाम मत होते.

सनातनांचा वाढता विरोध लक्षात घेऊन काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी नेहरुंना असा संल्ला दिला की जर तुम्ही हे बिल असाच मंजूर केले तर थोड्याच दिवसांनी नव्या निवडणुकीत काँग्रेसला पराभव पतकरावा लागेल नेहरुंनी डॉ. आंबेडकरांबरोबर चर्चा केली पण डॉ. आंबेडकर आपल्या भुमिकेपासुन तसुभरही दूर होत नाही हे पंडित नेहरुंना दिसुन आले. तेव्हां नेहरुनी काँग्रेस पुढाऱ्यांचा सल्ला स्विकारला. हा सारा प्रकार पाहुन डॉ. आंबेडकर खुप संतापले आणि रात्र दिवस मेहनत घेवुन तयार केलेला बिलाचा असा शेवट पाहुन ते मनस्वी दुखी झाले व त्यांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला.[4]

**आरक्षण तरतुद :-**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही तत्त्वप्रणालीचा स्वीकार करण्यात आला. राजकीय न्याय व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला एक व्यक्ती एक मत या नात्याने सर्वांना कायद्याने समान लेखण्यात आले होते. कायद्याने जरी सर्व व्यक्ती समान असल्या तरी व्यवहारात मात्र त्या समान आहेत का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल कारण राजकीय स्वातंत्र्यास खराअर्थ प्राप्त होण्याला सामाजीक, शैक्षणिक, आर्थिक बाबी देखील बळकट असाव्या लागतात हे स्पष्ट होते. नाही तर लोकशाही असुन ही हुकूमशाही ठरु शकते. असा विचार घटना समितीने केला असल्याने आरक्षण योजना मान्य करण्यात आली आहेत भारतीय घटनेमध्ये 15(4)46,243,240,(1)341,(1)342(1) या कलमाने दुर्बल असणाऱ्या घटकांचे सामाजीक,आर्थीक,शैक्षणिक मागासले पणा दुर करण्यासाठी शासनाने आरक्षणाची तरतुद मान्य केली आहे. आरक्षणाच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांनी कायदे मंत्री असताना आरक्षणातील पोटकलमाच्या भाषेतच सामाजीक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले वर्ग अशी उपसुचना मांडली तेवहा या उपसुचनेला पंडित नेहरुन सामाजिक प्रश्नावर आक्षेप घेवुन त्या ऐवजी आर्थीक शब्द वापरावा असे सांगितले होते. परंतू डॉ. आंबेडकर यांनी यांची सुचना फेटाळुन सामाजिक हा शब्द, अधिक व्यापक आहे असे सांगितले होत विकासाच्या मुख्य प्रवाहापासुन वंचित असणाऱ्या घटकांना इतर सशक्त समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांना कायद्याने देऊ केलेली विशेष संधी म्हणजे आरक्षण होय.अशी आरक्षणाची सोपी व्याख्या करता येते.[5]

**डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशन ला दिलेले निवेदन व भावी राज्यघटनेचा आराखडा :-**

3 फेब्रुवारी 1928 रोजी सायमन कमिशन भारतात आले. राष्ट्रीय कॉंग्रेस आणि मुस्लीम लिगने सायमन कमिशनला विरोध करुन त्यावर बहिष्कार टाकला. सायमन कमिशनवर कॉंग्रेस व मुस्लिम लिग बहिष्कार म्हणजे भारतीय जनेचा बहिष्कार होता असे आपणास म्हणता येणार नाही. कॉंग्रेसचे पुढारी श्रीनिवास अय्यंगार, सत्यमुर्ती आणि सांबमुर्ती यांनी सायमण कमिशनची भेट घेऊन त्याच्यापुढे त्यांनी आपले म्हणने सादर केले होते. या शिवाय देशातील निरनिराळ्या सर्वच समाजातील पुढाऱ्यांनी सायमन कमिशनला भेटुन आपली निवेदने दिली. यामध्ये ख्रिश्चन, मुसलमान, ब्राह्मोत्तर,शीख,व अस्पृश्य समाजाच्या पुढाऱ्यांचा समावेश होता अस्पृष्य समाजाचे पुढारी डॉ. बाबासाहेब यांनी ही 29 में 1928 रोजी बहीष्कृत हितकरणी सभेच्या वतीने ठाकरसी दामोदर हॉल, परळ मुंबई येथेल त्यांच्या कार्यालयात सायमन कमिशनला निवेदन दिले. या निवेदनावर मिशने 23 ऑक्टोबर 1928 रोजी साक्ष घेतली. इ.स. 1919 च्या कायद्याच्या संदर्भात भावी राज्यघटनेच्या सुधाराती आराखडा विस्तृतपणे तयार करुन तो सायमन कमिशनला दिला आणि कमिशनला सादर करणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले आणि एकटेच पुढारी होते. ब्रिटीश सरकारने इ.स. 1935 चा कायदा बनविण्याच्या अधिच 7 वर्ष आगोदर डॉ. आंबेडकरांनी भारताच्या भावी राज्य घटनेचा आराखडा तयार केला होता. या आराखड्यातील महत्त्वाच्या घटनात्मक तत्त्वावरच बाबासाहेबांनी पुढे गोलमेज परिषदा आणि घटना समिती कार्य केले.[6]

**अर्थतज्ञ डॉ. आंबेडकर :**

डॉ. आंबेडकर हे कोलबिया विद्यापिठात एम.ए. करित होते. एम.ए.च्या पदवीसाठी शोध निबंध सादर करावा लागत असे. तेव्हां आंबेडकरांनी एम.एम. पदवीसाठी 142 पृष्ठांचा एक प्रबंध सादर केला त्या प्रबंधाचे नाव होते. Addministration and Finance of the Cast India company यात इंस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनिती. शोध निबंधात इ.स.1772 ते 1858 पर्यतच्या काळातील कंपनीच्या प्रशासकीय धोरणांचा आणि वित्त विषय धोरणाचा अभ्यास केला आहे. कंपनीचे हे धोरणे भारतीयांसाठीकिती त्रासदायक व आर्थिक दिवाळखोरी आणणारे होती. यांचे वर्णन डॉ आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात दिले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात कि, ईट इंडिया कंपनी एकीकडे प्रशासन ही करते आहे तर दुसरी कडे व्यापारी दृष्टीकोन ठेवुन त्यांच्या माध्यमातुन प्रचंड नफादेखील कमावत आहे. सुरुवातीला जरी याचा हिशोब ठेवला नसला तरी त्यांच्या मध्ये प्रचंछ तफावत निर्माण झाली आहे. यासाठी ब्रिटीशांशी लोकसभे मार्फत कायदा करुन कंपनीचे आपल्या प्रशासनाचा व व्यापारांचा हिशोब वेगळा ठेवावा. असे सांगितले इ.स. 1813 मध्ये कंपनीचा कारभार काढुन घेण्यात आला. इ.स. 1858 मध्ये कंपनी बरखास्त करण्यत आली. आणि भारताचा राज्यकारभार इंग्लंडच्या संसदेतुन चालवला जावु लागला त्याच बरोबर ईस्ट इंडिया कंपनीने भारताला आर्थिक व दुरावस्थेला कसे नेले आहे याचे विशलेशन डॉ. आंबेडकरांनी आपल्या अहवालात केले आहे कंपनीला जो नफा मिळतो तो प्रचंड प्रचंड प्रमाणात असुन हा पैसा भारतात न राहता तो इंग्लंडला गेला. मगतो भाग धारकांना लाभांश देण्याच्या निमित्ताने किंवा खंडाच्या स्वरुपात का होईना तो इंग्लंडलाच जात होता कंपनी ऐवढ्यावरच समाधान झाली नाही तर त्यांना जासत पैसा पाहिजे होता. म्हणुन त्यांनी वेगवेगळी कर्ज उभारुन त्यामधुन पैसा मायदेशी नेला. त्याच प्रमाणे महसुलाच्या माध्यमातुनही जो नफा मिळविला आहे. त्याची सव्र आकडेवारी डॉ. आंबेडकरांनी दिली आहे. ऐवढा मोठा पैसा गोहा होत असताना त्याची विलेहाट कशी लावली जायची याचेही विशलेशण डॉ. आंबेडकर करताना दिसतात. डॉ. आंबेडकर म्हणतात खुप कमी रक्कम जनतेच्या हितासाठी वापरली जात असे वास्तवीक लोकउपयोगी कामांना प्राधानय देणे गरजेचे असते. परंतु तसे झाले नाही त्यासाठी ते उदाहरण देऊन स्पष्ट करतात की इ.स. 1899 -20 साली 13 टक्के रक्कम कर्जावरील व्याज व लष्करावरील खर्च 64.3 टक्के एवढी करण्यात आली. व इंग्लंडच्या आर्थिक विकासासाठी करण्यात आली म्हणजेत लष्कराजरी खर्च जास्त वाहत असला तरी भारतीय शिपायांना अत्यंत कमी वेतन मिळत असे चार भारतीय सैनीकांचे वेतन मिळुन एका युरोपीयकन शिपायांचे वेतन होत असे. त्यामुळ भारतीयांना कोणताच फायदा मिळत नव्हता हे त्यांनी दाखवुन देऊन इंग्रजांचे आर्थिक धोरण भारतीयांवर असे अभ्यास करणार होते हे स्पष्ट केले आहे. शोध निबंधाचा शेवट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'इंग्लंडला भारताने खूप दिले पण भारताला अक्षरशा कांहीच मिळाले नाही. याचे आश्चर्य जरी वाटले तरी आर्थिक दृष्टीहकोनातुन पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे. पंरतू इतर गोष्टीबाबत भारतीयांनी इंग्रजांचे ॠग्णी राहयला पाहिजे असे ही सांगतात ते म्हणतात. आर्थिक बाब सोडली तर कायदा सुव्यवस्था पाशमात्य शिक्षणाची ओळख विद्यापीठे, न्यायालय प्रशासकीय स्वरुपाच्या आधुनिक स्वरुपाची उभारणी या बाबत इंग्रजांचे आभारी असले पाहिले.'[7]

### शेड्युल कास्ट फेडरेशन :-

मजूर पक्षाच्या अपयशानंतर डॉ. आंबेडकर यांनी अखील भारतीय अस्पृश्य वर्गाची स्वतंव्य अशी शेड्युल्डकास्ट फेडरेशन या नावाची अखील भारतीय राजकीय संघटना सन 1942 मध्ये नागपूर मध्ये स्थापन केली. शेड्युल्ड कॉस्ट फेडरेशन च्या अस्पृष्यतेच्या उच्चाटनासाठी आणि अस्पृष्यांच्या विकासासाठी वेळोवेळी अनेक ठराव मान्य केल्या. ज्यात साधरणः गोलमेज परिशदेतील मागण्यांचीच पुनरावृत्ती करण्यात आली होती. या फोडरेशने भारतात ठिक ठिकाणी सत्यागृह करून अस्पृश्य समाजात जागती निर्माण केली. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली शेड्युल्ड कॉस्ट फेडरेशन या पक्षाने सन. 1946-1952 या वर्ष सार्वजनकि निवडणुका लढविल्या परंतु दोन्ही निवडणुकात कांही आपवाद सोडल्यास फेडरेशनच्या बहुतेक सर्व उमेदवाराचा पराभव झला. असला तरी डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचे सदस्य या नात्याने अस्पृश्यांच्या मांगण्या कॉंग्रेस आणि घटना समिती च्या समोर मांडल्या व घटना समितीने आणि कॉंग्रेस ने यांचा स्विकार केला. या नंतरच्या काळात अस्पृश्यता निवारण कायदा मंजुर करुन अस्पृश्यता पाळणे गुन्हा ठरविण्यात आला. विधी विषयक दृष्टीने विचार केल्यास आज भारतात अस्पृश्यता नष्ट झाली आहे. आणि त्यांना समान अधिकार प्राप्त झाले आहे. त्यासाठी विधी मंडळ मंत्री मंडळ आणि सरकारी सेवा यामध्ये कांही जागा राखीव ठेवण्यात येतात अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने या गोष्टी अतिशय महत्त्वाचे आहेत. त्याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकरांना द्यावेलागते.[8]

### सारांश :

डॉ. बाबासहेब आंबेडकर हे थोर समाज सेवक राजनिती तज्ञ,प्रचंड कायदे पंडित गाढे अभ्यासक व दुरदर्शीपणा बुध्दी, प्रामाण्यांच्या आधारावर निर्णय घेण्याची त्यांची क्षमता उच्च प्रतीची होती. निर्भय परिश्रमीक आणि वाईट रुढी, विरुध्द दंड थोपटुन उभा राहिलेला श्रेष्ठ पुरुषोउत्तम म्हणुन इतिहास त्यांनी गणना करिल,झुंझारपण हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण आहे. दिन दलीत मग ते कोणत्याही जातीचे असो त्यांच्या बद्दल त्यांना मनापासुन आदर बाळगीत असे. एक जबरदस्त शक्ती प्रवाह डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी तयार केला आणि त्यातुनच दलितात स्वाभीमान व स्वत्व त्यांनी जागविले. त्यांचे अस्तित्व म्हणजे नव्या युगाची नवी प्रवाहाच होती. डॉ. आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरुस्करते होते. त्यांनी लोकशाहीसाठी फारमोठे चिंतन केले व वस्तुनिष्ठ अशा विचारांची मांडणी सुध्दा केली. 1927 मध्ये त्यांनी मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचे सदस्य म्हणुन नियुक्त झाले त्यांनतर त्यांनी 1928 मध्ये सायमन कमिशन पुढे साक्ष देऊन अस्पृष्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मांगणी केली. 1930 मध्ये अस्पृश्यांचे पतिनिधी म्हणुन इंग्लंडमध्ये गोलमेज परिषदेमध्ये उपस्थित राहीले. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्यागृह, काळाराम मंदीर प्रवेश, 1932 मध्ये पुणे करार 1935 लॉ कॉलेजच्या प्राचार्यपदी नेमणुक, 1937 मध्ये स्वतंत्र मजुरपक्षाचीस्थापना, तर भारत स्वातंत्र्यानंतर कायदेमंत्री म्हणुन काम पाहिले संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या कार्यात त्यानी दारकमिशनला निवेदन दिले. हिंदु कोडबील आरक्षण तरतुद इत्यादी कितीतरी कार्यात त्यांनी आपली दुरदर्शीपणा दाखविला आधुनिक काळात राजयाच्या सत्ता वापरावयाची मुलभूत चौकटम्हणुन राज्य घटनेकडे पाहिले जाते याचे सर्व श्रेय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते.

### संदर्भ :

1) विलासराव देशमुख महाराष्ट्राचा कोहिणुर विद्याधर कांदे पाटील
फिनोलेक्स पब्लिकेशन सरस्वती कॉलनी, लातूर प्रथम आवृत्ती पृष्ठ क्र. 399
2) महाराष्ट्रातील राजकीय सामाजीक चळवळीचा इतिहास (1818 ते 1960) अनिल कठारे विद्याबुक्स पब्लिकेशन औरंगपुर औरंगाबाद पहिली आवृत्ती पृष्ठ क्र. 519,520,521
3) महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास अनिल कठारे , महादेव वाघमारे, गौतम पाटील चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्र. 285
4) कित्ता पृष्ठ क्र. 285
5) कित्ता अनिल कठारे , महादेव वाघमारे, गौतम पाटील चिन्मय प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्र.287-288
6) कित्ता पृष्ठ क्र. 154
7) कित्ता पृष्ठ क्र. 238
8) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत वा.भ. पाटील प्रथम आवृत्ती पृष्ठ क्र. 225

### संदर्भ ग्रंथ :

**1) विलासराव देशमुख महाराष्ट्राचा कोहीणुर**

2) महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक चळवळीचा इतिहास
3) अधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
4) भारतातंतील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास
5) महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास
6) जागतीक अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर
7) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास
8) महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास
9) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत.